मुद्रित पृष्ठों की संख्या : 6

# BMRLA–135

## बी. ए. (सामान्य) (बी. ए. जी.)

## सत्रांत परीक्षा

## दिसम्बर, 2025

## बी.एम.आर.एल.ए.-135 : आधुनिक भारतीय भाषा—मराठी

*समय : 3 घण्टे* *अधिकतम अंक : 100*

---

***नोट :*** *सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहेत.*

---

1. पुढीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंध लिहा : 20

(अ) तंत्रज्ञानाची मायानगरी

(ब) भ्रष्टाचार थांबणार कसा ?

(क) आपत्या राष्ट्रीय पक्षी

(ड) अभयारण्यातील फेरफटका

2. पुढीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे लिहा : 16

(अ) तुकारामाच्या अंभगाचे काही विशेष नमूद करा.

(ब) भूपाळीचा मुख्य उद्देश्य तुमच्या शब्दात सांगा.



Downloaded from www.IGNOUBABA.com

(क) तुतारीच्या दिर्घ निनादाने काय होणार आहे, चर्चा करा.

(ड) 'नव्या मनूतिल गिरिधर पुतळा' या कवितेचा सौंदर्यास्वाद घ्या.

3. पुढीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे लिहा : 12

(अ) 'कातरवेळ' या कथेतील सावित्रीबाईचे व्यक्तिमत्त्व चित्रण रेखाटा.

(ब) उष्मा असाह्य झाल्यामुळे तात्याच्या हालचाली कशा चालू होत्या ?

(क) लेखकाने 'चेलमा आणि चलमा' हे शब्द एकत्र आणून काय साधले ते स्पष्ट करा.

(ड) सोन्याच्या पिंपळाचे पावसाळ्यातील चित्रण करा.

4. पुढीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर विस्तृत टीप लिहा :12

(अ) पु. ल. देशपांडेना परदेशगमनाची कशी तयारी करावी लागली ?

(ब) ललित वाङ्मय वाचनाने आनंद होतो.

(क) 'कमवा आणिशिका' हा मंत्र भाऊरावांनी दिला.



Downloaded from www.IGNOUBABA.com

(ड) 'स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य नाही', असे छाया दातार का म्हणतात ?

5. केवलप्रयोगी अव्यय म्हणजे काय ? उदाहरणे देऊन स्पष्ट करा. 10

**किंवा**

पुढीलपैकी कोणत्याही **एका** कल्पनेचा विस्तार करा :

(अ) दिव्याखाली अंधार

(ब) अति तिथे माती

(क) उतावळा नवरा गडघ्याला बाशिंग

(ड) थेंबे थेंबे तळे साचे

6. पुढीलपैकी कोणत्याही **तीन** वाक्प्रचारांचा अर्थ सांगा: 6

(अ) आगीत उडी घालणे

(ब) इंगळ्या डसणे

(क) उंटावरचना शहाणा

(ड) उलट्या काळजाचा

(इ) एक माळेचे मणी



Downloaded from www.IGNOUBABA.com

**किंवा**

पुढीलपैकी कोणत्याही **तीन** म्हणीचा अर्थ स्पष्ट करा :

(अ) मनात एक जनात एक

(ब) केली तर दिवाळी नाही तर होळी

(क) यथा गुरु तथा शिष्य

(ड) नाचला येईना अंगण वाकडे

(इ) आज तुपाशी उद्या उपाशी

7. पुढीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नांचे उत्तर लिहा : 8

(अ) वसंत ऋतुच्या आगमनाचे तुमच्या शब्दात वर्णन करा.

(ब) कामगार स्त्रिया आणि शेतमजूर स्त्रिया यांची तफावत नोंदवा.

(क) इंटरनेटचा अतिवापर धोकादायक होणार का ?

(ड) संहारक्षम् अण्वस्त्रे व मानवीजीवन यांची चर्चा करा.

8. पुढील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा : 8

Modern science has placed at our disposal various modes of transport to journey from one place to another. We can travel by our own car or by a hired vehicle. Of the hired



Downloaded from www.IGNOUBABA.com

vehicles, it may be a bus or lorry, a taxi or van, a train or an aeroplane. Of all these, a railway train is the cheapest and most convenient mode of journey. It has its own charm and allurements which no other means of travelling can afford us. Last year my uncle who lives at Mumbai invited me to his house during the summer vacation for two months. I decided to go there along with my younger brother by a railway train.

9. पुढील उताऱ्याचा सारांश लिहा : 8

नदी काठची आंब्यांची झाडे बोडकी झाली होती. कारी सिताफळाची आळी तुरळक दृष्टीस पडत होती. चुकाऱ्याच्या आलीकडचे 'भुत्यावडाचे' झाड मात्र बुडाला पडलेली ढोली जपत दाट शाखासंभारासह उभे होते. त्याच्या ढोलीत मोठा भुजंग कितीतरी वर्षापासून राहत होता. रात्र झाली की, वडाच्या वस्तीला भुते येतात, असे म्हातारी माणसे सांगत; म्हणूनच त्याचे नांव भुत्यावड पडले: रात्र जज्ञ जशी वाढे तसतशी घुबडांची हालचाल अधिक वाढायची. हाका



Downloaded from www.IGNOUBABA.com

मारल्याप्रमाणे तर कधी तान्हे बाळ रडल्याप्रमाणे त्या वडावरून ती घुबडे आवाज काढीत. त्यांचा कर्कश्श ध्वनी धावडीत स्पष्ट ऐकू येत असे. डोंगरात ज्यांची शेती होती, ती माणसे वडाखालच्या वाटेने जाने सहसा टाळायची. बैलगाड़ी दुसऱ्या वाटेने जाने अशक्य असल्यामुळे गाडीवान वडाजवळ येताच बरोबर घेतलेले दगड घुबडांच्या दिशेने भिरकावत. तेव्हा घुबडांचा आवाज थोडा वेळ बंद व्हायचा. त्यावेळी गाडीवान वडाजवळून जोराने गाडी दामतीत. मधू चुकान्याच्या वारूळाजवळ आ तोच समोरून लाल गलोलवाला सरडा एक-दोन वेळा पैलवानाने दंड काढावेत तसे करून वारूळाच्या पुढे गेला. ऐटबाज सरड्याचे निरीक्षण करत तो चुकाऱ्याच्या पसरट आंब्याखाली आला. त्या आंब्याचा गोल आकार मधूला खूप आवडायचा.

× × × × ×



Downloaded from www.IGNOUBABA.com